INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD)
© 2026 IJNRD | Volume 11, Issue 2, February 2026 | ISSN: 2456-4184 | IJNRD.ORG

# मराठी साहित्यामधील व्यापारी –बाजारपेठीय वास्तवाचे दर्शन

प्रा. उज्वला उत्तम अहिरे
महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय (स्वायत्त), मालेगाव कॅम्प, मालेगाव, जि. नाशिक
मो. नं.: 7498416095, ई-मेल: ujwalaahire24@gmail.com

बीज शब्द –प्रमुख शब्द मानव, भाषा ,साहित्य, मराठीसाहित्य, साहित्य आणि संस्कृती, उत्पादन, व्यापार, व्यापारी, गिर्हाईक , विक्रेता,बाजारपेठ .

प्रस्तावना–

मानवी जीवनात भाषा ही खूप महत्त्वाची आहे. साहित्याचे माध्यम भाषा आहे .लेखक ,कवी हा समाजात राहतो. समाजात त्याला आलेले अनुभवतो अप्रत्यक्षरित्या साहित्यात मांडतो. म्हणून साहित्य ही सामाजिक संस्था आहे. मानवी जीवनात सुख, दुःख, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक ऐतिहासिक भौगोलिक राजकीय, शैक्षणिक अशी सर्व चित्रे साहित्यात प्रतिबिंबित होतात. आर्थिक विकास परिस्थिती, त्याबाबत संबंधित सर्व घडामोडी देखील साहित्यात आपली जागा निर्माण करतात . त्याबाबतचा सखोल अभ्यास आपण मराठी साहित्यातील व्यापारी बाजारपेठीय वास्तवाचे दर्शन अभ्यासणार आहोत., विचार करणार आहोत.

मराठी साहित्यात मानवी जीवनाची सर्व व्याप्ती बसावी असूच मराठी साहित्याचे एक स्वरुप आपणास दिसते. उदा. संतवाङ्मय, साहित्य आपण पाहिले तर आपणास समजते की, या साहित्यातून मानवास आनंदमत जीवन जगणे, परमेश्वर नामस्मरण, भक्तीचे महात्म्य सांगीतले जाते.

अभंग- संत तुकाराम महाराज

*लागला जीवाला छंद विठ्ठलाचा*

*भजनात यावा यासाठी वास चंदनाचा*

*आषाढी, कार्तिकी एकादशीला*

*वैष्णवांचा मेळा जमतो तुझ्या पंढरीला*

तसेच मराठी साहित्यात जगाचा पोशिंदा शेतकरी राजाची कहाणी देखील आपचे अस्तित्व घेते. शेतकरी आपल्या शेतात रात्रंदिवस राबून पिकांची लागवड करतो. उत्पादन काढतो , आपल्याच पिकमालाची किंमत ठरवण्यात मात्र त्याला अधिकार नाही. तो सरकार ,व्यापारी , दलाल, गिर्हाईक हे वस्तुचा भाव ठरवतात. शेतकर्याचे जीवन खूप कष्टमय असते. त्याची लहान मुले देखील शेतीत, थंडी, ऊन, पाऊस, वादळवारा काही असो परंतु काम करतात. आपल्या आईवडीलांना शेतीकामात मदत करावी लागते. प्रसंगी शिक्षणाकडे. दुर्लक्ष केले तरी चालेल. आपणास याप्रसंगी' लालचिखल' आणि 'बाजा ' याकथेतील पेन्टा आठवतो. तसेच

*माये गं माये*

*माये गं माये*

*नगं तोडू माझी साळा*

*लई लई शिकून*

*मोठ्ठ व्हायाचंय मला*

कवितेतील या लहान मुलीच्या ओळी आपणास आठवतात.

याओळीत आपणास समजते की, गरीब, शेतकरी, कष्टकरी, कामगार लोकांच्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. शेतकऱ्यांवर येणारी संकटे खूप असतात. उदा. पिकांसाठी हवे असणारे पाणी ते कमीजास्त असे काही होते. बेमोसमी अवकाळी पाऊस, दुष्काळ, पाऊस योग्य प्रमाणात न पडणे. अशी अनेक कारणे शेतकऱ्यांना हुलकावणी देतात. अयोग्य हवामान , वातावरणाचे परिणाम पिकांवर होतात. कांदे मका बाजरी , कापूस ,गहू , हरभरा, तूर ,मूग, ऊस, फळपिके, भाजीपाला इ. आपण डाळींब, द्राक्ष या फळपिकांच्याबाबत सांगू शकतो. यासर्व रब्बी, खरीप हंगामात येणार्या पिकांची, लागवड, वाढ, पिक काढणे आता अजून अवघड झाले आहे. आता शेतकऱ्यांच्या समस्या अजूनही वाढल्या आहेत. यासर्व कारणा समान व देखील जबाबदार आहे. मानवी कृत्यामुळेच नैसर्गिक संकटे उदा. आम्लयुक्त पाऊस रोगट पाणी हे ,रोगट हवामान, मृदेची खालावलेली गुणवत्ता इ. हे पिकांचे नुकसान करते. पिके निरोगी राहत नाहीत. अशावेळी औषधे फवारणी खर्च वाढतो. आणि पर्यायाने तेवढा खर्च निघेल एवढा देखील नफा ,पैसा मिळत नाही. शेतकरी त्यापिकाच्या विक्रीमध्ये नफा नाहीतर तोट्यात असतो. यागोष्टींमुळे शेतकर्याची आर्थिक परिस्थिती ही सातत्याने खालावत जाते. जेवढे पीक येते त्याचा देखील भाव योग्य मिळत नाही. मालाची किंमत व्यापारी, गिर्हाईक ठरवतो. याबाबत साहित्य आपल्या लेखनातून शेतकरी जीवन रेखाटन करतो. उदा.

*शेतकरी आहे आम्ही*

*बंद करा हे सगळं*

*काहीच नको आम्हाला*

*शेतकरी आहे आम्ही*

*मालाला भाव पाहिजे आम्हाला*

याकवितेत शेतमालाला भाव ......हेच शेतकर्यांची कथा आहे. तसेच '*बाप*' कविता.

*बाप-इंद्रजित भालेराव*

*माझा बाप शेतकरी*

*उभ्या जगाचा पोशिंदा*

*त्याच्या भाळी हा दिलेला*

*रात्रंदिवस काम धंदा*

*कष्ट सारे त्यांच्या अंगी*

*दुसर्याच्या हाती माल.*

सारांश-

साहित्य हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. साहित्य, संस्कृती, मानव आणि समाजयांचा परस्परांशी अतूट संबंध आहे. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक, मानसिक व भौगोलिक घटक हे साहित्याशी परस्परावलंबी आहेत. साहित्य निर्मिती करणारा लेखक किंवा कवी हा समाजात राहणारा माणूस असतो. समाजातील वास्तवाचे निरीक्षण त्याच्या साहित्यात अप्रत्यक्षपणे प्रतिबिंबित होत असते.

देशाचा विकास व्हायचा असेल तर प्रत्येक नागरिकाला किमान दोनवेळचे पोटभर अन्न मिळणे आवश्यक आहे. यासाठी देशाची आर्थिक परिस्थिती सक्षम असणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे समाज नैतिकदृष्ट्या सुखी, समाधानी व आनंदी असावा, ही अपेक्षा साहित्यातून मांडली जाते. त्यामुळे आर्थिक विषमता, दारिद्य, उपासमार, बेरोजगारी यांसारख्या प्रश्नांचे प्रतिबिंब साहित्य कृतींमध्ये प्रकर्षाने दिसून येते.

देशाच्या विकासाचा आधारस्तंभ असलेली लहान मुले व किशोरवयीन विद्यार्थी यांचा सर्वांगीण विकास होणे अत्यंत आवश्यक आहे. कायद्याने आणि नैसर्गिकदृष्ट्या बालकामगार टाळायला हवेत; परंतु आर्थिक दुर्बलतेमुळे अनेक मुले

लहानवयातच कष्टाची कामे करतात. शेतकऱ्यांची मुले आई-वडिलांसोबत नांगरणी, निंदणी, खुरपणी, पाणीपुरवठा, कापणी अशी कामे करतात. कापूस वेचणी सारख्या कामांमध्ये तर लहान मुले प्रौढांपेक्षा अधिक वेगाने काम करताना दिसतात. तसेच कापडनिर्मितीतील विणकाम, भाजीपाला व फळविक्री, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, किराणादुकाने, कापडविक्री, हॉटेल आदी ठिकाणी ही बालकामगार आढळतात.

यासर्व कारणांमुळे अशा मुलांचे शैक्षणिक कार्य इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागे पडते. अनेक मुले शिक्षण अर्धवट सोडतात. परिणामी त्यांचे भविष्य अंधकारमय बनते. अनाथ मुलांच्या बाबतीत तर शिक्षणासोबतच दोनवेळच्या जेवणाचाही प्रश्न गंभीर असतो. ही सामाजिक वेदना साहित्यकृतींमधून प्रभावीपणे मांडली गेली आहे. या समस्यांवर उपाय शोधण्याचा, समाज जागृती करण्याचा प्रयत्नही साहित्यामधून सातत्याने होताना दिसतो.

यावास्तवाचे सखोल आकलन होण्यासाठी साहित्याच्या अभ्यासक्रमात अशाविषयांचा समावेश करण्यात आला आहे, जेणेकरून विद्यार्थीही संकल्पना अधिक मानवी दृष्टिकोनातून समजून घेऊ शकतील. भास्कर चंदन शिवयांची ‘लालचिखल’ ही कथा शेतकऱ्याच्या कष्टाचे आणि बाजारपेठेतील शोषणाचे वास्तव प्रभावीपणे उलगडते. शेतकरी केवळ कष्ट करून मालबाजारात आणेपर्यंतच मालाचा मालक असतो; त्यानंतर व्यापारी, ग्राहक व बाजारव्यवस्था यांचाच त्यामालावर अधिकार राहतो, हे याकथेतून स्पष्ट होते. याप्रक्रियेचा बालमनावर होणारा मानसिक आघातही लेखकाने संवेदनशीलतेने चित्रित केला आहे.

याशिवाय विविध कथा, कविता, कादंबऱ्या व नाटकांमधील संदर्भांच्या आधारे व्यापारी-बाजारपेठीय वास्तव समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मानवी जीवन सुखी होण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि आर्थिक सुरक्षितता यामूलभूत गरजा महत्त्वाच्या आहेत. मात्र कुटुंबातील सर्व घटकांना या सुविधा समान प्रमाणात मिळतातच असे नाही. त्यामुळे अनेकांचे जीवन संघर्षमय बनते, याची जाणीव साहित्य करून देते.

एकूणच मराठी साहित्य मानवी जीवन अधिक सुंदर, संवेदनशील व जबाबदार बनवण्याची भूमिका बजावत आहे. व्यापारी व बाजारपेठीय व्यवस्थाही गरीब जनता, शेतकरी व कामगार यांच्या हिताची ठरावी, यासाठी समाजाला जागृत करण्याचे कार्य साहित्य सातत्याने करत आहे. म्हणूनच मराठी साहित्य मानवतेच्या मूल्यांची जपणूक करत सामाजिक परिवर्तनाची दिशा दाखवते, असे निश्चितपणे म्हणता येईल.

- **Copyright & License:**

© Authors retain the copyright of this article. This work is published under the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY 4.0), permitting unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.